N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** उपनगर पोलीस स्टेशन
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0157 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/05/2023 10:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार
      **Date From (दिनांक पासून):** 17/05/2023
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/05/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 6
      **Time From (वेळेपासून):** 17:43 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 18:27 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 18/05/2023 **Time (वेळ):** 01:11 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 002
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/05/2023 01:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** नंदुरबार तहसिल कार्यालयातील , आवारात ,नंदुरबार , 425412

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
   **(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री.दिलीप दासु वसावे

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | उमर्दे ,नंदुरबार ,उपनगर पोलीस स्टेशन,नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | उमर्दे बु//.नंदुरबार ,उपनगर पोलीस स्टेशन,नंदुरबार,महाराष्ट्र,425412, भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-8379975083

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. वसीम बशिर पिंजारी | | | 1. खाजगी लेखनीक ,अमर टकीजजवळ,देसाईपुरा,नंदुरबार ,उपनगर पोलीस स्टेशन, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |
| 2 | विशाल षिपुपाल घुगे | | | 1. खाजगी संगणक ऑपरेटर पुरवठाविभाग,तहसिल कार्यालय, ठाणेपाडा ,नंदुरबार ,उपनगर पोलीस स्टेशन,नंदुरबार, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मागणी केलेली लाचेची किंमत | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|
| | |

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

माझे नाव श्री दिलीप दासु वसावे, वय 37 वर्षे, व्यवसाय-मजुरी व शेती, रा.उमर्दे बु. ता. जि. नंदुरबार, मोबाईल क्रमांक 8379975083

समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी सौ. रेखाबाई दिलीप वसावे व चार मुले असुन पैकी दोन मुले चेतन व रोहन तसेच दोन मुली मानसी व रूचिता अशांसह एकत्र राहतो. माझे शिक्षण एस.वाय.बी.कॉम पर्यंत झालेले असून मी मजुरी व शेती करून माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवितो.

मी व माझे आई-वडील यापूर्वी एकत्र राहत होतो. परंतू मागील 7 ते 8 वर्षांपासून मी माझे पत्नी व मुलाबाळांसह वेगळा (विभक्त) राहत असून माझे आई-वडील हे माझे घराजवळच राहतात. आमचे कुटूंबाचे म्हणजेच माझे वडील श्री दासु वेच्या वसावे, आई सौ. कुसुमबाई वसावे, लहान भाऊ दिपक वसावे व मी दिलीप वसावे असे सर्व सदस्य मिळून आमचे एकत्र रेषनकार्ड होते. त्यानंतर माझा भाऊ दिपक वसावे याने मागील पाच ते सहा वर्षांपुर्वी त्याचे रेषनकार्ड स्वतंत्र करून घेतलेले आहे. तसेच मी देखील आई-वडीलांपासून वेगळा राहत आहे. त्यामुळे सदरचे रेषनकार्ड मधुन माझे नाव कमी करून, मी माझ्या पत्नी व मुलांसह वेगळे रेषनकार्ड बनविण्याचे ठरविले होते.

नविन रेषनकार्ड बनविण्यासाठी मी दिनांक 11/11/2022 रोजी तहसिल कार्यालय, नंदुरबार येथील वेंडर श्री हमीद शेख यांचेकडे गेलो असता तेथे त्यांचा नातेवाईक वसीम पिंजारी हा मिळून आला, तेव्हा त्याने मला काय काम आहे असे विचारले असता मी त्याला जुन्या रेषनकार्डवरील नाव कमी करून नवीन रेषनकार्ड तयार करून देणेबाबत माझे काम असलेबाबत सांगितले होते. तेव्हा वसीम याने मला तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील अधिकारी कर्मचारी यांचेशी त्याची ओळख असल्याचे सांगून मी तुझे काम लवकर करून देतो असे सांगितले.

त्यानंतर वसीम पिंजारी याने तेथील जवळच असलेल्या स्टॅम्प विक्रेत्याकडून (मला त्याचे नाव सांगता येणार नाही) 100/- रुपयाचा स्टॅम्प खरेदी करून आणणेबाबत सांगितले. मी त्या स्टॅम्प विक्रेत्याकडून 100/- रूपये किंमतीचा स्टॅम्प विकत घेवून आलो. त्यानंतर वसीम पिंजारी याने मला व माझी पत्नी सौ. रेखाबाई अशांना तहसिल कार्यालयाजवळील 'शकुंतला झेरॉक्स' या ठिकाणी माझी पत्नी व मी कुटुंबासह न राहता विभक्त राहत असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र बनविण्यासाठी पाठविले. त्यानंतर वसीम याने नविन रेषन कार्डचा नमुना फॉर्म नं. 1 भरून दिला, तो फॉर्म, प्रतिज्ञापत्र व आमचे कुटुंबातील सर्वांचे आधारकार्ड, माझी पत्नी सौ. रेखाबाई हिचे नाव तिचे माहेर मउनकुवपाडा, ता.साक्री, जि. धुळे येथून नाव कमी केल्याचा दाखला व माझे नाव कमी केल्याचा दाखला असे सर्व कागदपत्रे मी वसीम पिंजारी यं○ाचेकडे जमा केले, तसेच वसीम याने माझेकडून एक्ट्रा आधारकार्ड व रेषनकार्डची झेरॉक्स प्रती घेतल्या व सांगितले की, पुरवठा विभागातील कर्मचाÚयांशी बोलून रेषनकार्डचा ऑनलाईन नंबर काढून देतो. त्यानंतर त्याने सदर प्रकरण तहसिल कार्यालयाचे पुरवठा विभागात जमा केले होते. तसेच मला सांगितले की, तेथील संगणक ऑपरेटर विशाल सर माझे ओळखीचे असून मी त्यांना सांगून लवकर ऑनलाईन नंबर घेवून तुमचे काम करून देतो. तेव्हा मी वसीम पिंजारी यांना किती फि लागेल असे विचारले असता त्यांनी नंतर सांगतो बाबत

पोलीस निरीक्षक
उपनगर पो.स्टे. नंदुरबार



मला सांगितले होते.

त्यानंतर मी वेळोवेळी दर 10 ते 15 दिवसांनी वसीम पिंजारी यांना भेटून माझे रेषनकार्ड तयार झाले काय? याबाबत चौकशी केली असता माझ्या अर्जाची ऑनलाईन नोंदणी झालेली नाही, असे मला वसीम पिंजारी यांचेकडून समजले होते. त्यानंतर फेब्रुवारी-2023 मध्ये वसीम पिंजारी यांचेकडे गेलो असता त्याने मला पुरवठा विभागात जाऊन चौकशी करणेबाबत सांगितले, त्यानंतर मी पुरवठा विभागात गेलो असता तेथे असलेले श्री सामुद्रे यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की, मी साहेबांची सही व षिक्का घेवून ठेवतो, त्यानंतर दुसÚया दिवषी मी पुन्हा कार्यालयात जावून श्री सामुद्रे यांना भेटलो, तेव्हा त्यांनी नविन रेषनकार्डवर रेषन पुरवठा अधिकारी यांचा सही व षिक्का घेवून दिला व सांगितले की, हे नविन रेषनकार्ड संगणक ऑपरेटर विषाल यांचे खिडकीजवळ जावून ऑनलाईन करून घेणेबाबत सांगितले. त्यानंतर मी खिडकीजवळ जावून संगणक ऑपरेटर विषाल सर यांना भेटलो असता, त्यांनी माझे ऑनलाईन नोंदणी करून दिली व नंबर यायला वेळ लागेल असे सांगितले होते. त्यानंतर मी पुन्हा दि. 14 मार्च, 2023 रोजी संगणक ऑपरेटर विषाल सर यांना ऑनलाईन नंबर बाबत विचारले असता त्यांनी नंबर आला नसलेबाबत सांगून ऑनलाईन नंबर आलेनंतर मी वसीम पिंजारीकडे देवून देईल असे मला सांगितले व सदरचे नविन रेषनकार्डचे फि बाबत वसीम पिंजारी यांचेषी भेटून घेणेबाबत सांगितले, त्यानंतर मी घरी निघून आलो.

त्यानंतर मी पुन्हा दि. 09/05/2023 रोजी तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे जाऊन वसीम पिंजारी यांना भेटून मला रेषनकार्ड कधी भेटेल? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला सांगितले की, "तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागाचे विषाल सर तुला ऑनलाईन नंबर देतील, तो नंबर मिळाल्यावर मी तुझे रेषनकार्डवर तो नंबर टाकल्यावरच तुझे रेषनकार्ड तयार होईल. त्याकरीता मला ऑनलाईन नंबर देणारे विषाल सर यांना पैसे दयावे लागतील, तरी तु पुढच्या मंगळवारी येथे येवून विषाल सरांची भेट घे, ते भेटल्यावर त्यांनी नंबर दिल्यानंतर तु मला 1,000/- रुपये आणून दे, ते पैसे मी विषाल सर यांना दिल्यावरच मला तुझे रेषनकार्ड तुझे ताब्यात देता येईल " असे मला सांगितले होते. तेव्हा मी तहसिल कार्यालय येथे काम करणारे खाजगी इसम वसीम पिंजारी यांचेकडून ते मागत असलेले पैसे कोणतीही षासकिय फि नसलेबाबत वसीम पिंजारी यांचेकडून खात्री केलेली होती. तसेच मी पैसे दिल्याषिवाय मला माझे रेषनकार्ड माझे ताब्यात मिळणार नाही याची मला खात्री झालेली होती.

माझे, वसीम पिंजारी व पुरवठा षाखेत संगणकावर काम करणारे विषाल सर यांचेत कोणतेही वैर नसुन उधार-ऊसनवारीचा व्यवहार नाही. माझ्याकडुन वसीम पिंजारी व तहसिल कार्यालयातील पुरवठा षाखेतील विषाल सर हे मागत असलेले 1,000/- रुपये ही कोणतीही षासकीय फि नसुन ती लाचच आहे, अषी माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने आज मी माझे ओळखीचे अँन्टी करप्षनचे पोलीस संदिप नावाडेकर यांना समक्ष भेटून माहिती देऊन मला खाजगी इसम वसीम पिंजारी व तहसिल कार्यालयाचे विषाल सर यांचेविरुध्द तक्रार दयावयाची असलेबाबत सांगितले होते, तसेच मागील दि.09/05/2023 रोजीपासून मी मजुरी कामावर जात असल्याने मी अँन्टी करप्षन ब्युरो कार्यालयात येवू षकलो नाही.

त्यानंतर पोलीस संदिप नावाडेकर यांनी तात्काळ दिनांक 16/05/2023 रोजी माझे तक्रारीची खात्री करुन पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी साहेबांची ओळख करुन दिली होती. त्यानंतर त्यांचे सुचनेनुसार मी आपणास भेटून माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगितली होती. त्यानंतर आपण 02 पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार केल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार येथील श्री. दिपक रमेष पालवे, वरिश्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक 01, नंदुरबार, जिल्हा नंदुरबार व श्री. गजानन नारसिंग काकरवाल, वरिश्ठ लिपीक (वर्ग-3), सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्रमांक 02, नंदुरबार असे थोडया वेळानंतर पंच म्हणून हजर झाले होते.

त्यानंतर दोन्ही पंच व आपण माझे तक्रारीबाबत विचारपुस करुन मी वरिलप्रमाणे तक्रार स्वहस्ताक्षरात अँन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात लिहून दिलेली आहे. लेखी तक्रार लिहून दिल्यानंतर आपण व दोन्ही पंचांनी तक्रार वाचून त्यावर सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर आपण मला व दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीची माहिती देवून या तक्रारीबाबत पडताळणी करणे आवष्यक असल्याने पडताळणी करण्यासाठी मी व पंच नं.1 म्हणून श्री दिपक पालवे अषांना खाजगी इसम वसीम पिंजारी व तहसिल कार्यालयातील पुरवठा षाखेत काम करणारा संगणक ऑपरेटर विषाल घुगे सर यांना भेटणेसाठी तहसिल कार्यालय, नंदुरबार कार्यालयात पाठविणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे आपण खाजगी इसम वसीम पिंजारी व पुरवठा षाखेतील संगणक ऑपरेटर म्हणून काम करणारे विषाल घुगे हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? यांची खात्री करणेसाठी मला व दोन्ही पंचाना अगोदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हाताळावे बाबत कार्यप्रणाली समजावून सांगितली, तसेच पंच नं. 1 श्री दिपक पालवे, पंच नं.2 श्री गजानन काकरवाल व स्टाफ अषांना महत्वाच्या सुचना दिल्या. तसेच खाजगी इसम वसीम पिंजारी किंवा पुरवठा षाखेतील संगणक ऑपरेटर म्हणून काम करणारे विषाल घुगे यांनी पंच नं. 1 श्री. दिपक पालवे

पोलीस निरीक्षक
पो.स्टे. नंदुरबार



यांचेविषयी चौकशी केली तर त्यांचे मित्र म्हणून ओळख करुन देण्याचे सांगितले. त्यानंतर आपण सांगितलेप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सॅनडीक्स कंपनीचे 16 जीबीचे नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/संदिप नावाडेकर यांनी माझे शर्टचे आत गळ्यात पांढUया रंगाची दोरी बांधून त्यास व्हॉईस रेकॉर्डर बांधून सुरु करुन दिले ती वेळ 12.33 वाजेची होती, त्यानंतर पंच क्र.01 श्री. दिपक पालवे व मला खाजगी इसम वसीम पिंजारी व पुरवठा शाखेतील संगणक ऑपरेटर म्हणून काम करणारे विषाल घुगे यांना भेटणेसाठी तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे रवाना केले होते.

त्याप्रमाणे मी माझ्या ताब्यातील लाल व काळे रंगाचे होन्डा शाईन कंपनीच्या एम.एच. 39 ए.के. 4573 या दुचाकी मोटार सायकलवर बसून पंच नं. 1 श्री दिपक पालवे यांचेसह तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे गेलो. तेथे जाऊन खाजगी इसम वसीम पिंजारी यांची भेट घेतली असता त्याने मला ऑनलाईन क्रमांक आणण्यासाठी तहसिल कार्यालयाचे पुरवठा विभागातील संगणक ऑपरेटर विषाल घुगे सरांची भेट घेण्यासाठी सांगितले होते. त्यानुसार मी विषाल घुगे यांना भेटण्यासाठी तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात गेलो असता तेथे विषाल सर हे सुट्टीवर असल्याचे समजले. तसेच आज दिनांक 17/05/2023 रोजी पुन्हा कार्यालयात हजर राहणार असल्याबाबत तेथील कर्मचारीमार्फत समजले होते. त्यामुळे मी व पंच नं. 01 श्री दिपक पालवे असे ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात परत आलो. तेव्हा आपल्या सुचनेवरुन पोना/नावाडेकर यांनी माझे शर्टचे आत पांढ-या रंगाचे दोरीस बांधून लावलेले व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आपल्या ताब्यात दिले. ती वेळ 12.45.47 वाजेची होती.

त्यानंतर आपण व दोन्ही पंच अशांनी सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग झालेले संभाषण ऐकुन, माझे व पंच नं. 1 श्री दिपक पालवे यांचे समक्ष पडताळणी पंचनामा क्र. 1 तयार केला असून सदरचा पंचनामा पोहवा/विलास पाटील यांनी टाईप केलेला आहे. तरी माझी व पुरवठा विभागातील संगणक ऑपरेटर विषाल घुगे यांची भेट न झाल्याने दिनांक 17/05/2023 रोजी पुन्हा पडताळणी करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर आपण मला व दोन्ही पंच यांना दिनांक 17/05/2023 रोजी सकाळी 10○:30 वा ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात हजर राहणेबाबत व गोपनियता पाळणेबाबत सुचनापत्र दिलेले होते.

आपण दिलेल्या सुचनेनुसार आज दिनांक 17/05/2023 रोजी मी सकाळी 10○:30 वाजता कार्यालयात आलो, त्यानंतर दोन्ही पंच देखील हजर झाले. त्यानंतर आपण पुन्हा मला व दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीची माहिती देवून माझे तक्रारीबाबत पडताळणी करण्यासाठी मी दिनांक 16/05/2023 रोजी दिलेल्या तक्रारीप्रमाणे खाजगी इसम वसीम पिंजारी व पुरवठा शाखेत संगणक ऑपरेटर म्हणून काम करणारे विषाल घुगे हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? याची खात्री करणेसाठी आपण मला व पंच नं. 01 श्री दिपक पालवे अशांना तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आपण पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हाताळावे याबाबत कार्यप्रणाली समजावून सांगितली. तसेच पडताळणी पंचनाम्यात उल्लेख केल्याप्रमाणे मला, पंच नं. 1 श्री दिपक पालवे, पंच नं.2 श्री गजानन काकरवाल व स्टाफ अशांना महत्वाच्या सुचना दिल्या.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Narendra Bhaidas Bhadane(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

पोलीस निरीक्षक

**... मधील प्रथम खबरीची हकीकत पुढे सुरु -**

... पोना/नावाडेकर यांनी आपले सूचनेवरुन व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सॅनडीक्स कंपनीचे 16 जीबीचे नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/संदिप नावाडेकर यांनी माझे शर्टाचे आत गळ्यात पांढ-या रंगाची दोरी बांधून त्यास व्हॉईस रेकॉर्डर बांधून सुरू करून दिले ती वेळ 11.21 वाजेची होती.

त्यानंतर मी माझ्या ताब्यातील लाल व काळे रंगाचे होन्डा षाईन कंपनीच्या एम.एच. 39 ए.के. 4573 दुचाकी मोटार सायकलवर बसुन पंच नं. 1 श्री दिपक पालवे यांचेसह तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे जाऊन पुरवठा विभागातील संगणकावर ऑनलाईनचे काम करणारे विषाल घुगे सर यांची पुरवठा विभागातील संगणक कक्षात जाऊन भेट घेतली. तेव्हा विषाल सरांनी मला खिडकीत येवून बोलणेबाबत सांगितले. मी खिडकीत आल्यावर विषाल घुगे सरांना वसीम पिंजारीने भेटावयास पाठविले असे सं◌गितल्यावर विषाल सरांनी माझ्याकडे असलेल्या झेरॉक्स कागदपत्रावर ऑनलाईन नंबर लिहून दिला व "रेषनकार्डची फि वसीमकडे देऊन टाक" असे हळू आवाजात सांगितले. तेव्हा मी त्यांना "तुमची काय फि असेल ते त्या कागदपत्रावरच लिहून द्या" असे सांगितले असता विषाल सरांनी मला वसीम भाईला माहिती आहे, तोच तुला सांगेल असे सांगून खाजगी इसम वसीम पिंजारीला भेटण्यास सांगितले होते. त्यानुसार मी पुन्हा तहसिल कार्यालयाचे परिसरात खाजगी इसम वसीम पिंजारीची भेट घेतली असता वसीम पिंजारी याने माझेकडे 1,000/- रुपयांची मागणी केली. तेव्हा मी वसीम पिंजारी याला तु विषाल सरांना यातले किती पैसे देषील? याबाबत विचारणा केली असता विषाल सरांना 200/- ते 300/- रुपये द्यावे लागतील व उर्वरीत पैसे माझे असे सांगून सदर पैसे आज दिनांक 17/05/2023 रोजी सायंकाळी 05◌:30 वा आणून देण्याबाबत सांगितले होते. खाजगी इसम वसीम पिंजारी याने केलेली पैषांची मागणी हि पंच नं. 1 श्री दिपक पालवे यांचेसमक्ष करण्यात आलेली आहे. तसेच सदरचे बोलणे हे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले असुन ते आपण व दोन्ही पंचांनी ऐकुन तहसिल कार्यालयातील संगणक विभागाचे विषाल घुगे यं◌ानी रेषनकार्डवर ऑनलाईन नंबर काढुन दिलेबद्दल माझेकडुन फिची मागणी करून सदरची फि खाजगी इसम वसीम पिंजारी सांगले तेवढी त्याचेकडे जमा कर असे सांगितले. त्यानंतर मी खाजगी इसम वसीम पिंजारी याची भेट घेतली असता त्याने माझेकडे 1,000/- रुपये लागतील बाबत सांगितले व त्यातील 200-300/- रुपये विषाल घुगे यांना व उर्वरीत स्वत:साठी अषी एकुण 1000/- रुपये लाचेची मागणी केलेली असलेबाबत खात्री झालेली आहे. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले मेमरी कार्ड काढुन आपण ताब्यात घेतले.

त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा क्र. 2 आपण, तक्रारदार व आम्ही दोन्ही पंच अषांनी सांगितलेप्रमाणे पोहवा/विलास पाटील यांनी ॲन्टी करप्षन ब्युरो कार्यालयातील संगणकावर टाईप केलेला आहे.

त्यानंतर खाजगी इसम वसीम पिंजारी यांनी सायंकाळी 05.30 वाजता पैसे आणून देणेबाबत सांगितल्याने, सर्वानुमते सायंकाळी 05◌:30 वा सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आपण माझेकडे पंचासमक्ष खाजगी इसम वसीम पिंजारी व संगणक ऑपरेटर विषाल घुगे यांना देण्याकरीता लाचेची मागणी केलेले पैसे 1,000/- रुपये हजर करण्यास सांगितले असता, मी माझे मजुरीचे कामाचे बचतीतून आणलेले 1,000/-रुपये हजर केले होते. त्यात 500/-रु. दराच्या दोन चलनी नोटा होत्या. सदर नोटांना आपल्या सूचनेवरुन पोना/देवराम गावीत यांनी एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा/टॉर्च काढून आमचे समोर ठेवला. तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हॉयोलेट दिवा आणि सिलबंद पाकीटात ॲंथ्रासिन पावडरची बाटली असल्याबाबत आपण सांगून त्यांचे गुणधर्म व वैषिष्ट्यांबाबत सांगितले. त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाषात आणि त्यानंतर ॲन्टी करप्षन ब्युरोचे पोनि/माप मॅडम यांचे म्हणजेच आपले कक्षाचे लाईट व दरवाजे बंद करुन अंधार केला, त्या अंधारात अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याचे प्रकाषात आपले, दोन्ही पंचांचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात व कपडे व मी लाच देणेकामी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या दोन चलनी नोटा तपासल्या, सर्व काही नैसर्गिक नेहमीप्रमाणे दिसून आले. त्यानंतर आपले कक्षात पूर्ववत उजेड करण्यात आला.

वरील नोटांना पोना/देवराम गावीत यांनी त्या बाटलीचे झाकण उघडून त्या बाटलीतील ॲंथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने एका पांढरे कागदावर दोन्ही बाजूने क्रॉस आकाराने लावली सदर नोटा आपले कक्षाचे दरवाजे बंद करून अंधार करून अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याचा प्रकाष टाकून तपासले असता, सदर नोटांवर फिकट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांनी सदर नोटा माझे शर्टाचे पुढिल डाव्या खिषात ठेवल्या. त्यानंतर पोना/देवराम गावीत यांना सापळा पार्टीतून वगळण्यात आले. त्याबाबतचा सापळापुर्व पंचनामा ॲन्टी करप्षन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे पोहवा/विलास पाटील यांनी ॲन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार कार्यालयातील संगणकावर टाईप करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी साहेब व आपण मला, पंच नं. 1 श्री दिपक पालवे, पंच नं. 2 श्री गजानन काकरवाल तसेच पोलीस हवालदार पाटील, पोलीस नाईक अमोल मराठे, पोलीस हवालदार विजय ठाकरे, महिला पोलीस हवालदार ज्योती पाटील, पोलीस नाईक मनोज अहिरे अषांना पुन्हा सापळा कार्यवाहीबाबत महत्वाच्या सूचना दिल्या. त्यात मला खाजगी इसम वसीम पिंजारी हे जोपर्यंत लाचेची रक्कम मागणी करीत नाहीत तोपर्यंत स्वत:हून लाचेची रक्कम न देणेबाबत सांगण्यात आले. त्यानंतर पोना/नावाडेकर यांनी व्हॉईस रेकॉर्डमध्ये सॅनडीक्स कंपनीचे 16 जीबीचे नवीन मेमरीकार्ड टाकुन पोना/संदिप नावाडेकर यांनी माझे शर्टाचे आत गळ्यात पांढ◌ऱ्या रंगाची दोरी बांधून त्यास व्हॉईस रेकॉर्डर लावून दिले. त्यानंतर सोबत पंच न. 1 श्री. दिपक पालवे व मी खाजगी इसम वसीम पिंजारी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी ॲन्टी करप्षन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथून तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे सायंकाळी 05.43 वाजता रवाना केले. आपण, पंच न. 2 श्री. गजानन काकरवाल व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे खाजगी वाहनांनी आमचे मागोमाग तहसिल कार्यालयाचे आवारात येऊन आपले अस्तित्व लक्षात येणार नाही असे थांबले. मी पंच नं.01 श्री. दिपक पालवे असे तहसिल कार्यालय,

नंदुरबार येथे गेलो असता खाजगी इसम वसीम पिंजारी हे मिळून न आल्याने मी तेथे बसलेले व्हेंडर हमीद शेख यांना वसीम भाई कोठे आहेत? बाबत विचारणा केली असता ते चहा पिण्यासाठी बाहेर गेले असल्याचे मला समजले.

थोडा वेळ वाट पाहिल्यानंतर खाजगी इसम वसीम पिंजारी हे सदर ठिकाणी आले, तेव्हा मी श्री.वसीम पिंजारी यांचेशी चर्चा केली असता "माझे रेषनकार्ड सापडत नसून तु उद्या जेवणाची सुटी असेल त्यावेळी म्हणजे दुपारी 1०:00 वाजता ये, मी नविन रेषनकार्ड हे संगणक ऑपरेटर विषाल सर यांचेकडुन घेवून ठेवतो, असे त्याने मला सांगून हाताचा इषारा करुन पैसे मागीतले, तेव्हा मला त्याचा इषारा न समजल्याने मी त्याला क्या करु? असे विचारल्यावर त्याने पुन्हा हाताचा इषारा करुन "दे के जा" असे संागून माझेकडे पैषांची मागणी केली असता मी माझे शर्टाचे डावे बाजुला असलेल्या खिषातून उजव्या हाताने पैसे काढुन खाजगी इसम वसीम पिंजारी यांचे समोर धरले असता वसीम पिंजारी यांनी लाचेची 1,000/-रू. 500/- रुपये दराच्या दोन चलनी नोटा हया त्यांचे डाव्या हाताने स्विकारल्या. तेव्हा मी तात्काळ मला ठरवून दिलेला दोन्ही हात वर करण्याचा इषारा केला असता श्रीमती वाघ मॅडम, पंच नं. 2 श्री काकरवाल व त्यांचे सापळा पथकाने खाजगी इसम वसीम पिंजारी यांना पंच साक्षीदारांसमक्ष रंगेहाथ पकडले. त्यावेळी पोना/अमोल मराठे यंानी त्याचा डावा हात व पोहवा/विलास पाटील यांनी त्यांचा उजवा हात असे दोन्ही हात मनगटापासुन घट्ट पकडून ठेवले. त्यादरम्यान पोना/मनोज अहिरे यांनी आपले सुचनेवरुन माझे शर्टाचे आत गळयात पांढ्‌या रंगाची दोरीस बंाधण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आपल्या ताब्यात ठेवले. ती वेळ सायंकाळी 06.27 वाजेची होती. त्यानंतर खाजगी इसम वसीम पिंजारी यांना आपण आपली स्वत:ची ओळख देऊन आपले ओळखपत्र दाखवून त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. वसीम बषीर पिंजारी, वय 26 वर्षे, व्यवसाय-खाजगी लेखनिक, तहसिल कार्यालय, नंदुरबार, सध्या रा. देसाईपुरा, नंदुरबार असे सांगितले.

त्यानंतर आपण वसीम पिंजारी यांना तहसिल कार्यालयात पुरवठा विभाग येथे संगणक ऑपरेटर म्हणून काम करणारे खाजगी इसम श्री विषाल घुगे यांचेबाबत विचारणा केली असता तो घरी निघून गेले असल्याबाबत सांगितले होते.

त्यानंतर आपण खाजगी इसम वसीम पिंजारी यांना माझेकडुन लाचेची रक्कम घेतांना पंच साक्षीदारासमक्ष रंगेहाथ पकडल्यानंतर तहसिल कार्यालयातील पुरवठा षाखेतील संगणक कक्षात सर्व कार्यवाही केल्यानंतर आपला स्टाफ, दोन्ही पंच व खाजगी इसम वसीम पिंजारी यांना घेवून अॅन्टी करप्षन ब्युरो कार्यालयात शासकीय वाहन बोलावून त्या वाहनाने कार्यालयात येवून आपण व आपलो पथकाने आपली कागदोपत्री कार्यवाही केली.

तसेच काही वेळाने पोलीस उपअधीक्षक श्री. राकेष चौधरी साहेब, पोलीस निरीक्षक श्री वाघ साहेब तसेच पोना/गावीत व पोना/नावाडेकर असे संगणक ऑपरेटर खाजगी इसम विषाल घुगे यांचेसह अॅन्टी करप्षन ब्युरो कार्यालयात परत आले होते. त्यावेळी मी अॅन्टी करप्षन ब्युरो कार्यालयाचे उजवीकडील मोकळया मैदानात झाडाच्या आडोषाला उभा होतो.

तरी दिनांक 17/05/2023 रोजी 05.43 वा ते 06.27 वाजताचे दरम्यान तहसिल कार्यालय, नंदुरबार कार्यालयाचे उजवीकडील बाजूस असलेल्या ठिकाणी श्री. वसीम बषीर पिंजारी, वय 26 वर्षे, व्यवसाय-खाजगी लेखनिक, तहसिल कार्यालय, नंदुरबार, रा. देसाईपुरा, नंदुरबार यांनी मला त्यांची तहसिल कार्यालय, नंदुरबार येथील अधिकारी कर्मचारी यांचेषी ओळख असल्याचे सांगून लवकरात लवकर रेषनकार्ड काढून देण्याचे भासवून सदर केषरी रेषनकार्ड काढून देण्याचे मोबदल्यात व तहसिल कार्यालयात पुरवठा विभागात संगणक ऑपरेटरचे काम करणारे खाजगी इसम श्री विषाल विष्णुपाल घुगे, वय 32 वर्षे, व्यवसाय-संगणक ऑपरेटर (खाजगी), तहसिल कार्यालय, पुरवठा विभाग, नंदुरबार रा. ठाणेपाडा ता. जि. नंदुरबार यांनी रेषनकार्डचा ऑनलाईन नंबर देण्याचे मोबदल्यात माझेकडुन खाजगी इसम वसीम पिंजारी यंाचे मार्फतीने 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम 1,000/- रुपये खाजगी इसम वसीम पिंजारी यांचे हस्ते स्विकारली म्हणून माझी श्री. वसीम बषीर पिंजारी, वय 26 वर्षे, व्यवसाय-खाजगी लेखनिक, तहसिल कार्यालय, नंदुरबार व तहसिल कार्यालयात पुरवठा विभागात संगणक ऑपरेट म्हणून काम करणारे खाजगी इसम श्री विषाल विष्णुपाल घुगे, वय 32 वर्षे, रा. ठाणेपाडा ता. जि. नंदुरबार यांचेविरुध्द कायदेषीर फिर्याद आहे.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या OI खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Narendra Bhaidas B
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):